८०५

**दिनांक १ जानेवारी १९८६ नंतर सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण, वेतनश्रेणींच्या सुधारणेमुळे सुधारित करणे.**

**महाराष्ट्र शासन** CR1988102601

**वित्त विभाग**

परिपत्रक क्रमांक वेपुर-१२८८/५९२/सेवा-१०

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर १९८८

**पहा.**--(१) शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/१५४/सेवा-१०, दिनांक १ ऑक्टोबर १९८८.

(२) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/५७५/सेवा-१०, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८.

(३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/५८९/सेवा-१०, दिनांक २१ ऑक्टोबर १९८८.

**परिपत्रक**

शासन अधिसूचना, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/१५४/सेवा-१०, दिनांक १ ऑक्टोबर १९८८ या अन्वये सुधारित वेतनश्रेणी आणि त्यामधील प्रारंभिक वेतन निश्चितीबाबतचे नियम निर्गमित करण्यात आले आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८८/५७५/सेवा-१०, दिनांक १२ ऑक्टोबर १९८८ नुसार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना विनंती करण्यात आली आहे की, त्यांनी, वरील नियम, दिनांक १ जानेवारी १९८६ ते आदेश निर्गमित झाल्याचा दिनांक यामधील कालावधीमध्ये निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांसहित सर्व शासकीय कर्मचाऱ्यांच्या नजरेस त्वरित आणावेत. जे दिनांक १ जानेवारी १९८६ ते आदेश निर्गमित झाल्याचा दिनांक या कालावधीमध्ये निवृत्त झाले त्यांना विकल्पाचे नमुने द्यावेत आणि त्यांनी आपला विकल्प विहित कालावधीमध्ये द्यावा असा सल्ला द्यावा अशीही त्यांना खास करून विनंती करण्यात आली आहे. जे राजपत्रित अधिकारी स्वतः आहरण आणि संवितरण अधिकारी होते त्यांच्या बाबतीत त्यांचे विकल्प संबंधित महालेखापाल/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांचेकडे पाठवावयाचे आहेत. या प्राधिकाऱ्यांनी विकल्प प्राप्त झाल्यानंतर लगेच सुधारित श्रेणीमध्ये वेतन निश्चित करावे आणि वेतनचिठ्ठी, संबंधित कर्मचाऱ्यांकडे थकबाकीची मागणी करण्यासाठी पाठवावी. संबंधित महालेखापाल/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांना विनंती करण्यात येते की, वेतनचिठ्ठीची दुसरी प्रत त्यांनी, यथास्थिती, महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर यांच्या कार्यालयामधील निवृत्तिवेतन शाखेकडे पाठवावी. त्यांना विनंती करण्यात येते की, सुधारित वेतनचिठ्ठीच्या आधारे त्यांनी निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांच्या रकमा सुधारित करण्यात आणि ज्या कोषागार अधिकाऱ्यांकडून हे कर्मचारी आपले निवृत्तिवेतन घेत असतील त्याला सुधारित रकमा देण्यासाठी प्राधिकृत करावे. हे काम शीघ्रगतीने करावे.

२. १ जानेवारी १९८६ आणि हे आदेश निर्गमित झाल्याचा दिनांक या कालावधीमध्ये त्यांच्या विभाग/कार्यालयामधून निवृत्त झालेले अराजपत्रित कर्मचारी आणि आस्थापना देयकावर ज्यांचे वेतन काढले जाते असे राजपत्रित अधिकारी यांनाही विकल्पाचे नमुने द्यावेत आणि त्यांनी विकल्प विहित मुदतीत द्यावा असा सल्ला देण्यात यावा, अशी विभाग/कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येत आहे. विकल्प प्राप्त झाल्यानंतर विभाग/कार्यालय प्रमुखांनी १ जानेवारी १९८६ रोजी सुधारित श्रेणीमध्ये वेतन निश्चित करावे आणि त्यांना देय होणारी थकबाकी काढावी. दिनांक १ जानेवारी १९८६ ते निवृत्तीच्या दिनांकापर्यंतच्या सुधारित वेतनाच्या आवश्यक त्या नोंदी सेवापुस्तकामध्ये घेतल्या जातील हे पहाण्याचीही त्यांना विनंती करण्यात येत आहे. निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण याबाबत सुधारित परिगणना ज्ञापन त्यांनी तयार करावे आणि ते यथास्थिती, महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर यांच्याकडे सेवापुस्तकासहित, निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान/निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरण यांच्या सुधारित रकमा प्राधिकृत करण्यासाठी पाठवावे. याबाबतीत त्वरित कार्यवाही केली जाईल

(शा.म.मु.) एच १८३८ (१५,०००--१०-८८)

आणि निवृत्तिवेतन/मृत्यू-नि-सेवा उपदान आणि निवृत्तिवेतनाचे अंशराशीकरणाच्या सुधारित रकमा, सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांना प्राधिकृत केल्या जातील याची विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी खात्री करावी अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे.

३. ज्या कर्मचाऱ्याने विद्यमान श्रेणी चालू ठेवली आहे आणि जो १ जानेवारी १९८६ नंतर सेवानिवृत्त झाला आहे त्याच्या बाबतीत, सेवानिवृत्तिवेतन/निवृत्तिउपदान/कुटुंबनिवृत्तिवेतन यांपैकी जे संबंधित असेल ते, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक वेआशि-१०८७/४२५/सेवा-१०, दिनांक १८ ऑगस्ट १९८७ मधील परिच्छेद ४ ते ८ नुसार परिगणित करावे. त्यांच्या बाबतीत, सेवानिवृत्ति लाभांची परिगणना करण्यासाठी, "वेतन", विद्यमान श्रेणीतील मूळ वेतन अधिक त्या मूळ वेतनास अनुरूप १ जानेवारी १९८६ रोजी अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता आणि तदर्थ महागाई भत्ता आणि दिनांक १ जानेवारी १९८६ रोजी अंमलात असलेल्या दराने विद्यमान मूळ वेतनास अनुरूप असलेल्या दोन अंतरिम वाढी, असे असेल.

४. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**व्यं. दे. पानसे,**

शासनाचे सहसचिव.

प्रति--

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
राज्यपालांचे सचिव.
मुख्य मंत्र्यांचे सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र. २६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली.
संचालक, लेखा व कोषागारे मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई.
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
वित्त विभागातील सर्व कार्यासने.
निवड फाईल, वित्त विभाग—सेवा-१०.

*पत्राद्वारे

१९८८ चा क्रमांक

माहिती व मार्गदर्शनाकरिता प्रत रवाना.